Golden Research Thoughts
Volume : 1 Issue : 2, August - 2011
ISSN:- 2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

प्राचीन व परंपरागत शस्त्रास्त्र म्हणून तलवारीचे महत्त्व

अनिल माणिकराव बैसाणे

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे

प्रस्तावना

तलवार हे एक प्राचीन व परंपरागत शस्त्रास्त्र आहे. धनुर्विद्येतील वर्गीकरणानुसार तलवार हे अमुक्त म्हणजे हाताने धरून लढण्यासाठी असलेले एक शस्त्र आहे. यामुळे शत्रूला भोसकून फटकारून आणि जवळून घव घालून घायाळ करता येते. पूर्वीच्या काळी पायदळ व घोडेस्वार युद्धासाठी तलवार वापरीत होते. तलवारीच्या मा-याचा बचाव करण्यासाठी ढाल व चिलखत यांचा उपयोग करण्यात येत होता. शत्रूच्या तलवारीचे वार स्वतःच्या तलवारीवर झेलून किंवा चुकवून आत्मरक्षण करीत.[1]

पाते व मूठ हे तलवारीचे दोन भाग आहेत. सुरूवातीच्या काळात तलवारीच्या पात्याचा आकार कन्हेरीच्या पानासारखा असल्यामुळे पात्यास पान असेही म्हणतात. पानाच्या आकारावरून व त्यातील विविधतेतून ती धारण करणा-याची मनोभूमिका कळून येते. त्याचबरोबर युद्धात तलवारी कशारीतीने हाताळली जात असावी हे समजते. मूठ हे पानात बसविल्यामुळे तलवार हाताच्या पंजात पकडता येते आणि त्यामुळे पंजाचे व बोटांचे रक्षण होते.

अश्मयुगातील दगडी अणकुचिदार शस्त्रास्त्रांपासून तलवारीची उत्क्रांती झाली असून शस्त्रास्त्रांचा विकासक्रम लक्षात घेताना गदा, कु-हाड, गोफण, धनुष्यबाण व भाला यानंतर तलवार प्रचारात आली. इ.स.पूर्व तिस-या शतकात भारतात 40 सें.मी.लांबीच्या आखूड तलवारी प्रचलित होत्या.

तलवारीचा संग्रह :

राजवाडे इतिहास संशोधन मंडळात विविध आकाराच्या एकोणीस तलवारी संग्रहित आहेत. ह्या तलवारी कै. वा. ल. चौधरी, कै. मगर तासकर, श्री. नागेश मोगलाईकर, वि. बा. रणसिंग, विसाभाऊ पाताळे, जगदीश पळशीकर आदि मान्यवरांनी मंडळाला भेट म्हणून दिल्या आहेत.[2]

यातील सर्वात लहान तलवारीचे आकारमान मूठ 12 X 3 से.मी., पाते 39 X 2.3 से.मी. होता. बहुतेक ह्या तलवारीचा उपयोग प्रशिक्षरण देण्यासाठी करीत होते. सर्वात मोठ्या तलवारीचे आकारमान मूठ 12.3 X 8 X 27 सें.मी. गोलाकार आहे. मूठ ही लाकडी असून सैल झाली आहे. या तलवारीचे पान 110 X 3 सें.मी, टोक 1 सेंमी आहे. यावर वेलबुटीचे नक्षीकाम केले असून ती आकर्षक दिसते.

तलवारीचे वर्गीकरण

सर्वसामान्यपणे तलवारीच्या पात्यावरून तलवारीचे वर्गीकरण केले जाते. मजबूत तलवारीचे वर्गीकरण केले जाते. मजबूत तलवारीचे पान व मूठ असे दोन महत्त्वाचे भाग पडतात. तलवारीच्या पानावरून योध्यांची मनोभूमिका कळून येते. त्याचबरोबर ती युद्धात कशारितीने हाताळली जाते, हे समजण्यास मदत होते. प्रथम पानाचे खालीलप्रमाणे मुख्य भाग पडतात ते पुढीलप्रमाणे आहेत.

दुमाला

पोलादाच्या पानाला जोड देवून दुमाला तयार करावी लागते. प्रथम मोठी पिंपळाची लाख गरम करून आतून त्यात दुमाला बसवून गच्च भरण्यासाठी सळीने दाबून घ्यावे लागते. ते इतके गरम करावे लागते की मूळ व पान यांचा एकजीव झाला पाहिजे. दुमाला याची अनुकूची मुठीच्या पोकळ भागात बसविण्यात येते. त्याला दुमाला असे म्हणतात.[3] तलवारींच्या पानातून दुमाला निघेलच असे नाही. पोलाद जर नरम असेल तर त्याच्या अंगातून दुमाला निघू शकतो. कठीण पोलादाच्या पानाला जोड देवून दुमाला तयार करण्यात येते.

खजाना

खजाना म्हणजे दुमाला संपल्यानंतरचा भाग होय. याचा काही भाग मुठीत बसविला जातो. बाकीचा बिनारेचा जाडीचा भाग तलवारीच्या पानात बसविला जातो, याला खजाना असे म्हणतात.

पेटा

पेटा म्हणजे तलवारीचा मध्यभाग होय. हा भाग अतिशय महत्त्वाचा असून यासाठी उत्तम व कठीण पोलाद वापरले जाते. तलवारीस पाणी द्यावयाचे असते ते या मध्यभागाला म्हणजेच पेट्याला दिले जाते.

पिंपळा

पिंपळा म्हणजे तलवारीचा शेवटचा भाग होय. हा भाग कित्येकवेळा तलवारीत निमुळता असून ते दुधारी असते.

टोक

त्लवारीचे टोक नेहमी फार तीक्ष्ण करून घेतले जाते. त्याचा ऐन प्रसंगी फार उपयोग होतो. ब्रिटिशांकडील कीरच नावाच्या तलवारीस फक्त टोकच चांगली धारदार होती असे दिसून येते.

धार

तलवारीच्या धारेला वाढ असेही म्हणतात. धार काढण्यासाठी कारागीरांच्या अंगी कुशलता असावी लागते. ही धार खजान्यानंतर सुरू करून टोकापर्यंत काढण्यात येते. पिंपळ्याच्या दोन्ही बाजूस धार काढण्याची पद्धत होती. परंतु एका बाजूने किंवा दोन्ही बाजूने धार काढावयाची हे तलवार उपयोग करणाऱ्या व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून होती. काही व्यक्ती तलवारीच्या पानाला एकाच बाजूस धार काढून घेत होती. ज्या तलवारी दुधारी होत्या त्या शक्यतो सरळ पानाच्या तलवारी होत्या. उदा. ओपाला, वासलावाढ, मसुरी, राई इत्यादी धराचे प्रकार तत्कालीन काळात प्रचलित होते.

पाठ

मानवाच्या पाठीला ज्याप्रमाणे महत्त्व आहे त्याचप्रमाणे तलवारीच्या पाठीला देखील महत्त्व आहे. तलवारीची पाठ तयार करण्याचे काम कारागीराला अतिशय चौकसपणे व कौशल्यपूर्ण करावे लागते. पाठ चांगली नसेल तर फक्त वाराच्या झटक्याने तलवार तुटण्याची शक्यता जास्त असते. यासाठी पानाची जोड मोठ्या शिताफीने करावी लागते. पाठ जितकी जाड असेल तितकी तलवार चांगली असून ती मजबूत व टिकाऊ असते.

तलवारीच्या मुठीचे वर्णन

तलवार या शस्त्राचा अभ्यास करतांना मुठीकडे दुर्लक्ष करून त्याचा अभ्यास करणे अशक्य आहे. कारण मुठीशिवाय तलवार ही कितीतरी दर्जेदार असली, तरी ती उपयोगी ठरत नाही. मध्ययुगीन कालखंडात इराणी, शहाजहानी, गिलोटा व वास्केट इत्यादी मुठीचे नावे आढळतात. याचबरोबर राजस्थनी व मुघलांच्या प्रचलित तलवारींच्या मुठीवर चित्रे व कलाकुसरीचे काम केल्याचे दिसते. या मुठींवर ससा, घोडा, हरण, हत्ती, साप, सिंह व बकरी इत्यादी प्राण्यांची मुखचित्रेही आढळतात.

मोगरा

मुठीच्या वरील भागास व फुलाच्या कळीसारख्या आकाराला मोगरा असे म्हणतात. काही मोगऱ्यांना छिद्रे करण्याची पद्धत असल्याचे दिसून येते. या छिद्रांमध्ये रेशमी दोरी किंवा चामडी अडकविली जात होती. यामुळे तलवार वापरतांना हातातून निसटून जात नसे. याला हस्ती किंवा अडकवणी असेही म्हणतात. या दोरीचा किंवा दस्तीचा मनगटात अडकविण्याकरिता याचा वापर करीत असावेत.

बत्तासा

मोगऱ्यानंतरचा व खालचा भाग म्हणजे बत्तासा किंवा फूल होय. याचा आकार बत्ताश्यासारखा असतो. म्हणूनच याला बत्तासा असे म्हणतात. खालील भाग कोरलेला पाकळीदार असतो म्हणून याला फूल असेही म्हणतात.

वाटी किंवा कटोरी

मुठीवरील गोल भाग कटोरीच्या किंवा वाटीच्या आकाराचा असतो. सर्वच मुठीत हा भाग खोलगट असतोच असे नाही. या वाटीवर अनेक प्रकारचे नक्षीदार कोरीव काम केल्याचे दिसते.

पुतला

पुतला म्हणजे मूठ होय. ही मध्य भागावर असून जाड व दोन्ही बाजूस निमूळती अशी असते. या भागात कापडाची गादी किवा चामड्याची गादी बसवलेली असते. मुठीवरून हात सरकू नये म्हणून या गादीवर रूप्याची तार गुंफून घेतली जाई.

टोले

मुठीच्या खालील भागाला टोले असे म्हणतात. यामुळे हाताच्या मुठीचे संरक्षण होते. कित्येक टोले लांब व गोल तर कित्येक कप्पेदारही असतात.

नखे

नखे म्हणजे खजान्यावरील भाग होय. यामुळे म्यानची पकड मजबूत राहते. कित्येक नखे लांब व आखूड असून ते नक्षीदारही असतात. ते अधिक आकर्षक दिसून येतात.

चौक

पुतळ्यानंतरच्या भागाला चौक असे म्हणतात.

परज

परज म्हणजे वाटी व टोल्यास जोडलेला भाग होय. याला ओढा किंवा बिनी असेही म्हणतात. यामुळे हाताच्या हातकटट्या हाताला लागत नाहीत. त्यामुळे तलवार वापरणाऱ्या व्यक्तीच्या हाताचा बचाव होत असे. परज नसलेली तलवार वापरणे जोखीमचे होते.

कंगणी

मोगऱ्याच्या खाली कंगणी तयार करतात. यामुळे मूठ ही आकर्षक दिसते.

कंठी

कंठी ही मुठीच्या गळ्यात असते, तिला कंठी असे म्हणतात.

जनोई

जनोई म्हणजे जानवे होय. हे जानवे हिंदू लोक आपल्या तलवारीच्या मुठीवर कोरून घेत असावेत.[4]

संदर्भग्रंथ

1. जोशी ल.शा., ***मराठी विश्वकोष, खंड 7,*** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, 1977, पृ. 239.

2. हजिरनिस व. ग. (संपा.), ***स्मृतीशलाका,*** राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, प्रथमावृत्ती, 1992, पृ. 88.
3. मणिकराव रा., ***श्रीप्रताप शस्त्रगार,*** सरकारी छापखाना, बडोदा, प्रथमावृत्ती, 1942, पृ. 81.
4. पंत जी. एन., ***भारतीय अस्त्र:शस्त्र,*** आर्मी एज्युकेशन स्टोअर्स, न्यू दिल्ली, प्रथमावृत्ती, 1974, पृ. 170.

अनिल माणिकराव बैसाणे
इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे